SAMPLE CONTENT

PERFECT

# मराठी सुलभभारती

इयत्ता

## आठवी

(Eng. Med.)




प्राची शेंडे
M.Com., C.A.

सावली म्हात्रे
M.A., D.T.Ed.



Target Publications® Pvt. Ltd.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे
यांच्याद्वारे नियोजित नवीन अभ्यासक्रमावर आधारित.

# PERFECT
# मराठी सुलभभारती
## इयत्ता आठवी (English Medium)

**टळक वैशिष्ट्ये**

- दहावीच्या अध्ययावत कृतिपत्रिका आराखड्यानुसार रचना.
- कृतींचे संकलित व आकारिक मूल्यमापनानुसार विभाजन.
- दहावीच्या कृतिपत्रिका आराखड्यानुसार पाठांचे परिच्छेदांमध्ये विभाजन.
- पाठाखालील सर्व प्रश्नांचा सुयोग्य उत्तरांसहित समावेश.
- वैविध्यपूर्ण आकलन कृतींचा सुयोग्य उत्तरांसहित समावेश.
- व्याकरणाच्या अधिकाधिक सरावाकरता प्रत्येक पाठ, कविता व स्थूलवाचनाच्या अंती भाषाभ्यास विभाग अंतर्भूत.
- स्वतंत्र व्याकरण विभाग अंतर्भूत.
- स्वतंत्र उपयोजित लेखन विभाग अंतर्भूत.

Sample Content

Printed at: **Prabodhan Prakashan Pvt. Ltd.,** Navi Mumbai

© *Target Publications Pvt. Ltd.*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

Balbharati Registration No.: 2018MH0022 TEID: 2595 P.O. No. 7510

# प्रस्तावना

शिक्षणमंडळाने निर्धारित केलेला 'आठवी मराठी सुलभभारती' चा अभ्यासक्रम ज्ञानरचनावादावर आधारित असून पाठांतरापेक्षा भाषेच्या आकलनावर अधिकाधिक भर देणारा आहे. भाषा शिकण्यातला आनंद विद्यार्थ्यांना पुरेपूर घेता यावा, भाषेच्या गमतीजमती कळाव्यात यासाठी अशा अभ्यासक्रमाची रचना केली आहे. या अभ्यासक्रमाचे बारकाईने विश्लेषण करून तयार केलेले **टार्गेट प्रकाशनाचे PERFECT मराठी सुलभभारती : इयत्ता आठवी** हे पुस्तक तुमच्या हाती सोपवताना आम्हांला आनंद होत आहे.

हे पुस्तक विद्यार्थ्यांचा भाषेच्या वैभवाशी परिचय करून देण्यास निश्चितच उपयोगी पडणारे आहे. यात विविध साहित्यप्रकार, त्यांच्यातील बारकावे विविध कृतींच्या उत्तरांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसमोर उलगडण्यात आले आहेत. त्यामुळे, विद्यार्थ्यांना भाषेचा लळा लागून भाषेवर प्रभुत्व मिळवणे सहज शक्य होईल. आकारिक मूल्यमापनाअंतर्गत येणाऱ्या कृतींची उत्तरे विद्यार्थ्यांना भाषेची व्याप्ती समजून देणारी आहेत. उपक्रम व प्रकल्पांच्या माध्यमातून भाषेचा व्यावहारिक उपयोग व त्याचे महत्त्व विद्यार्थ्यांमध्ये रुजवणारे हे पुस्तक विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक ठरेल अशी आम्हांला खात्री आहे. पाठाच्या मांडणीच्या क्रमानुसार कृतींची मांडणी हे टार्गेटच्या पुस्तकांचे वैशिष्ट्य आहे. प्रत्येक कृतीचा क्रम पाठाच्या मांडणीच्या क्रमानुसार ठेवलेला आहे, त्यामुळे कृती सोडवताना पाठातील घटनाक्रम पुन्हा एकवार स्पष्ट होऊन विषयाचे ज्ञान पक्के होते.

या पुस्तकाद्वारे मराठी भाषेच्या शब्दवैभवाची विद्यार्थ्यांना निश्चितच कल्पना येईल. सदर अभ्यासक्रम विद्यार्थ्यांची आकलनशक्ती व अभिव्यक्ती कौशल्य जोखणारा आहे. या अभ्यासप्रक्रियेत हे पुस्तक उत्तम मार्गदर्शक ठरेल याची आम्हांला खात्री आहे.

या पुस्तकाची विविध प्रकारची वैशिष्ट्ये पुढील पृष्ठावर विस्तारित स्वरूपात देण्यात आली आहेत. त्यावरून या पुस्तकाचे अंतरंग जाणून घेण्यासाठी आपणांस मदत होईल.

**धन्यवाद !**

**अभिनव अभ्यासासाठी मन :पूर्वक शुभेच्छा !**

**प्रकाशक**

**आवृत्ती :** तृतीय

हे पुस्तक परिपूर्ण व्हावे यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत, तरी पुस्तक अधिकाधिक उत्कृष्ट व्हावे यासाठी आपल्या सूचना स्वागतार्ह आहेत. आपल्या सूचना, अभिप्राय पुढील इ-पत्त्यावर पाठवा mail@targetpublications.org

Sample Content

**Disclaimer**

This reference book is transformative work based on 'मराठी सुलभभारती; चौथे पुनर्मुद्रण :२०२२' published by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

# KEY FEATURES

***Summative and Formative Assessment:*** Activities in all chapters have been segregated into summative and formative assessment.

***Central idea of Chapter / Poems:*** The summary of all chapters and poems has been provided for quick understanding of the central idea of the chapter/poem.

***Glossary:*** A Glossary containing the meanings of all the difficult words and phrases from the chapter has been provided. For the convenience of the students these words have been arranged alphabetically.

***Notes:*** Notes providing explanation of the difficult concepts in lucid language have been given. These notes have been arranged alphabetically.

***Segregation of chapters:*** For better understanding all the chapters have been segregated into extracts with ample activities based on them.

***Integrated Questions*:** The textual questions requiring holistic answers have been covered in each chapter.

***Grammar and Language Study*:** For ensuring ample practice, we have provided this special section at the end of each chapter, which extensively covers all the Grammar and language study activities.

***Formative Assessment*:** Answer of some questions under formative assessment have been provided through Q. R. code wherever needed.

***Paraphrase of Poem:*** For greater clarity and insights to the poem the paraphrase have been provided.

***Dedicated Grammar Section:*** For thorough understanding of grammar a dedicated section on Grammar has been provided. This section covers explanation of the concepts and ample examples with practice questions based on 'शब्दांच्या जाती, उपसर्ग आणि प्रत्यय, उद्देश्य आणि विधेय, वाक्यांचे प्रकार, लेखननियम, विरामचिन्हे, म्हणी, आलंकारिक शब्द'.

***Writing Skills*:** This section towards the end of the book includes all the writing skills activities prescribed for the students, with the explanation of concepts in lucid language. It contains chapters on 'पत्रलेखन, शीर्षकलेखन, सारांशलेखन, जाहिरातलेखन, संवादलेखन, बातमीलेखन, सूचनाफलक व निबंधलेखन'.

Sample Content

# अनुक्रमणिका


| क्र. | पाठाचे नाव | लेखक / लेखिका / कवी / कवयित्री | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १. | आम्ही चालवू हा पुढे वारसा | जगदीश खेबूडकर | १ |
| २. | मी चित्रकार कसा झालो! | ल. म. कडू | ३ |
| ३. | प्रभात | किशोर बळी | १२ |
| ४. | आपण सारे एक | प्रभा बैकर | १७ |
| ५. | घाटात घाट वरंधा घाट | महेश तेंडुलकर | २४ |
| ६. | आभाळाची अम्ही लेकरे | वसंत बापट | ३१ |
| ७. | नातवंडांस पत्र | नंदू नाटेकर | ३५ |
| ८. | गिर्यारोहणाचा अनुभव | रमेश महाले | ४२ |
| ९. | झुळूक | दामोदर कारे | ५१ |
| १०. | आम्ही हवे आहोत का? | शांता शेळके | ५७ |
| ११. | जीवन गाणे | नितीन देशमुख | ६६ |
| १२. | शब्दकोश (स्थूलवाचन) | | ७१ |
| १३. | संतवाणी (अ) आजि सोनियाचा दिवस | संत सेना महाराज | ७३ |
| | संतवाणी (आ) चंदनाच्या संगें | संत चोखामेळा | |
| | **व्याकरण विभाग** | | ७४ |
| | **उपयोजित लेखन विभाग** | | |
| १. | पत्रलेखन | | ९१ |
| २. | शीर्षकलेखन | | ९४ |
| ३. | सारांशलेखन | | ९७ |
| ४. | जाहिरातलेखन | | १०० |
| ५. | संवादलेखन | | १०५ |
| ६. | बातमीलेखन | | १०८ |
| ७. | सूचनाफलक | | ११३ |
| ८. | निबंधलेखन | | ११५ |


**[टीप : पाठाखाली दिलेले प्रश्न * या चिन्हाने दर्शवले आहेत.]**

Sample Content

Don’t lose out on marks in Grammar & Writing Skills
Practice more & score full with Target’s **“व्याकरण - भाषाभ्यास व उपयोजित लेखन”** Scan the adjacent QR Code and go for it now.

# २ मी चित्रकार कसा झालो !

– ल. म. कडू

## पाठाची पार्श्वभूमी

प्रस्तुत पाठामधून लेखक ल.म.कडू यांनी बालवयातच सुरू झालेला चित्रकार बनण्याचा आपला प्रवास रेखाटला आहे. मनात एखाद्या गोष्टीची तीव्र इच्छा असेल, तर प्रतिकूल परिस्थितीतही, साधनांच्या अभावातही आहे त्या परिस्थितीतून मार्ग काढत आपली इच्छा पूर्ण करता येते. निसर्गाच्या सहवासात आपल्याला आपल्यात दडलेल्या कलांचा शोध घेण्याचे अनेक मार्ग गवसतात व त्यातून यशाचा मार्ग मोकळा होतो हे लेखकाने स्वत:ची उदाहरणे देऊन स्पष्ट केले आहे. आपल्यात दडलेला संशोधक, आपल्यातील सुप्त इच्छाशक्ती सतत जागी ठेवण्याचा संदेश या पाठाद्‌वारे लेखकाने दिला आहे.

## शब्दार्थ

| | |
|---|---|
| अडचण | समस्या (problem) |
| अवघे | संपूर्ण (whole) |
| आपसूक | आपोआप (intuitively) |
| आयते कपडे | तयार कपडे, शिवलेले कपडे (readymade clothes) |
| कायम | नेहमी (always) |
| कोवळे | (tender) |
| खडक | दगड (rock, stone) |
| खेडे | गाव (village) |
| गडप | गायब (disappear) |
| गोठा | गुरांना बांधून ठेवतात ते ठिकाण (cowshed) |
| घनदाट | गर्द, झाडाझुडपांनी गच्च भरलेले (dense) |
| डोह | खोल पाण्याची जागा, तळी, नदी यांतील खोल भाग (pool) |
| ढलपी | तुकडा (flake) |
| तडा | भेग (crack) |
| दडणे | लपणे (to hide) |
| धाक | जरब (awe, fear) |
| धुंडाळणे | शोध घेणे (to seek for) |
| नाना | विविध (various) |
| न्हाणीघर | स्नानगृह (bathroom) |
| पराग | फुलातील रज:कण (pollen grains) |
| परीने | तऱ्हेने (according to one's ability) |
| फक्की | चूर्ण, पूड, भुकटी (chalk powder) |
| फायदा | लाभ (benefit) |
| बोंड | बीजकोश (follicle) |
| मनसोक्त | मन भरेपर्यंत (to the heart's content) |
| मुरूम | चिकट मातीचे खडे (claystones) |
| रान | जंगल (forest) |
| लगत | जवळ, नजीक (near) |
| लादणे | थोपणे (to impose) |
| लोणी | दूध, दही घुसळल्यास निघणारा पदार्थ (butter) |
| वात्रटपणा | आगाऊपणा, मस्ती (mischievous) |
| विरोधात | विरुद्‌ध मत (against) |
| सर्जन | नवनिर्माण क्षमता (creativity) |
| साधना | तपश्चर्या (continous hardwork to achieve a goal) |
| सुसंस्कृत | चांगले संस्कार असलेला (cultured) |

## वाक्प्रचार व त्यांचे अर्थ

| | |
|---|---|
| अडून बसणे. | हटून बसणे. (to be adamant) |
| उफाळून येणे. | उसळून वर येणे. (to surge) |
| तहानभूक हरपणे. | कामात मग्न होणे. (to get encouraged) |
| दुथडी भरून वाहणे. | ओसंडून वाहणे. (to overflow) |
| दंग होणे. | मग्न होणे. (to get engrossed) |
| नाद लागणे. | छंद लागणे. (to be obsessed) |
| मर्जीत राहणे. | आवडते बनून राहणे, विश्वासार्ह बनणे. (to win one's trust) |
| सुरसुरी येणे. | जोम येणे. (to get engrossed) |
| हिरमोड होणे. | नाराज होणे. (to be upset) |

Sample content

## टिपा

| | |
|---|---|
| आर्किमीडिज | भौतिकशास्त्रातील स्थितिकी या उपशाखेविषयी, तरफेच्या यंत्रणेवर, तसेच गणितातील घनफळ, पॅराबोला इत्यादी विषयांवर मूलभूत संशोधन करणारा ग्रीक गणितज्ज्ञ, भौतिकशास्त्रज्ञ. |
| काटेसावर, शेंदरी, बांबू | काही वनस्पतींची नावे |
| कॅनव्हास | तैलचित्र काढण्याकरिता चित्रकार वापरत असलेले कापड |
| नांद्रुक | पिंपरण आणि पिंपळवर्गीय झाड |
| प्राथमिक शिक्षण | १ ली ते ८ वी पर्यंतचे शिक्षण |
| युरेका | आर्किमीडिजला भौतिकशास्त्रातील एका तत्त्वाचा शोध लागताच त्याने आनंदाने काढलेले ग्रीक भाषेतील उच्चार (त्याचा अर्थ सापडले/ गवसले असा होतो.) |
| वैशाख, चैत्र, श्रावण | मराठी वर्षातील काही महिने |

## संकलित मूल्यमापन (Summative Assessment)

(**टीप :** परीक्षेमध्ये संपूर्ण उतारा देण्यात येईल. या उताऱ्याचे वाचन करून त्यावर आधारित कृतींची उत्तरे लिहिणे अपेक्षित आहे. जागेअभावी येथे केवळ उताऱ्याची सुरुवात व शेवट देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांनी हा उतारा पाठ्यपुस्तकातून वाचावा व त्यावर आधारित कृती सोडवाव्यात.)

परिच्छेद १

### कृती १ - आकलन

**१. आकृत्या पूर्ण करा.**

**i.** लेखकाच्या मते आपल्या फायद्याच्या गोष्टी

**उत्तर :** १. निसर्गाच्या विरोधात न जाणे
२. निसर्गाच्या मर्जीत राहणे

**ii.** निसर्गाकडून आपणाला होणारी मदत

**उत्तर :** १. पालनपोषण होते
२. नाना कला शिकवतो
३. सर्जनाच्या वाटा शोधण्यास मदत करतो

***iii.** लेखकाने त्यांच्या खेड्याचे सांगितलेले विशेष

**उत्तर :** १. निसर्गरम्य २. सुसंस्कृत

***iv.** लेखकाच्या खेड्याचे सौंदर्य वाढवणारे घटक

**उत्तर :** १. घनदाट जंगल
२. दुथडी भरून वाहणारी नदी
३. निळे डोंगर
४. हिरवी रानं

**v.** चित्र काढण्याकरिता लेखकाकडे नसलेली साधने

**उत्तर :** १. पेन्सिल २. रंग
३. ब्रश ४. कागद

**२. एका शब्दात उत्तरे लिहा.**

i. याला विसरून अजिबात चालणार नाही –

ii. लेखकाच्या शिक्षणाचा हा टप्पा लहानशा खेड्यात पार पडला –

**उत्तर :** i. निसर्ग ii. प्राथमिक शिक्षण

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. २**
**[मी तुमच्याएवढा ................**
**................ वात्रटपणा वाटायचा.]**

### कृती २ - आकलन

**१. 'सर्जनशीलता' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.**

**उत्तर :** खेड्यातील निसर्गरम्य वातावरणात माणसामध्ये कोणती गोष्ट उफाळून येते ?

Sample Content

**२. परिणाम लिहा.**
**निसर्ग धुंडाळत राहिले.**
**परिणाम :** सर्जनाच्या वाटा आपसूक सापडतात.

**३. कारणे शोधा व लिहा.**

**i. चित्र काढण्याची इच्छा असूनही लेखकास चित्र काढता येत नव्हते ; कारण...**

**उत्तर :** चित्र काढण्यासाठी आवश्यक असणारी पेन्सिल, रंग, ब्रश, कागद अशी कोणत्याही स्वरूपाची साधने लेखकाकडे उपलब्ध नव्हती. शिवाय, चित्र काढणे हा लेखकाच्या मास्तरांना व घरातल्यांना वात्रटपणा वाटे.

**ii. लेखकाच्या पेन्सिलचे तुकडे झाले तरी ती सांभाळून वापरावी लागे ; कारण...**

**उत्तर :** लेखक जेथे वाढले तेथे शिक्षणास पूरक साधने अतिशय कमी प्रमाणात उपलब्ध होती. एक पेन्सिलही फार मुश्किलीने मिळत होती. त्यामुळे, पेन्सिलचे तुकडे झाले असता पुन्हा नवी पेन्सिल मिळण्याची शक्यता नव्हती.

### कृती ३ - स्वमत

**१. निसर्गाकडून तुम्हांला कोणती कला शिकाविशी वाटते ?**

**उत्तर :** निसर्ग हा आपल्या वर्तनातून मानवाला विविध कला शिकवत असतो. हे समजून घेऊन त्या कला आपल्या अंगी बाणवणे महत्त्वाचे असते. मला निसर्गाकडून दातृत्वाची कला शिकाविशी वाटते. निसर्ग नेहमीच मोठ्या मनाने देत राहतो. कोणत्याही फळाची अपेक्षा करत नाही. कोणताही भेद करत नाही. मुक्त मनाने आपले वैभव तो सर्वांसाठी मोकळे करून देतो. त्याबदल्यात त्याला कसलीही अपेक्षा नसते. मलाही स्वार्थाचा त्याग करून निसर्गाप्रमाणे मोकळ्या मनाने सर्वांकरिता जगायचे आहे. शक्य तेवढी मदत प्रत्येकाला करायची आहे. त्याचे दातृत्व अंगी बाणवायचे आहे.

## परिच्छेद २

### कृती १ - आकलन

**१. आकृत्या पूर्ण करा.**

**i.** काठालगतच्या खडकांचे स्वरूप → ☐ ☐ ☐ ☐

**उत्तर :** १. गुळगुळीत    २. सपाट
३. लांबरुंद पसरलेले    ४. भलेथोरले

**ii.** ☐ ← लेखक राहत असलेल्या भागात आढळणाऱ्या, चित्र रेखाटण्याकरिता उपयुक्त ठरलेल्या गोष्टी → ☐

**उत्तर :** १. तांबूस रंगाचा मुरूम
२. पिवळट रंगाचे दगड

***२. एका शब्दात उत्तर लिहा.**
चित्र काढण्यासाठी वापरला जाणारा कागद –
**उत्तर :** दगड

**३. खालील चौकटी पूर्ण करा.**

**i.** या महिन्यातील ऊन करपवून टाकणारे असे → ☐

**ii.** काठालगत मोठ्या प्रमाणावर सापडणारी गोष्ट → ☐

**उत्तर :** i. वैशाख    ii. खडक

**४. योग्य पर्याय निवडून वाक्ये पूर्ण करा.**

**i. नदीकाठच्या भल्याथोरल्या खडकावर _______**
अ. निवांत बसता येणार होते.
ब. गवत उगवले होते.
क. मनसोक्त चित्र काढता येणार होती.
ड. मनसोक्त शिल्प कोरता येणार होते.
**उत्तर :** मनसोक्त चित्र काढता येणार होती.

**ii. लेखक राहत असलेल्या भागात तांबूस रंगाचा ______**
अ. दगड आढळत असे. ब. नजारा दिसत असे.
क. मुरूम सापडत असे. ड. पक्षी आढळत असे.
**उत्तर :** मुरूम सापडत असे.

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. २**
**[वैशाख महिन्यातलं ................**
**................ काढणं सुरू झालं.]**

### कृती २ - आकलन

***१. काय ते सांगा.**
**लेखकाचा कॅनव्हास :**

**उत्तर :** लेखक राहत असलेल्या ठिकाणी नदीकाठी विविध प्रकारचे खडक होते. पाण्याच्या प्रवाहामुळे ते गुळगुळीत, सपाट व लांबरुंद पसरले होते. त्या खडकांवर लेखकाला मनसोक्त चित्र काढता येणार होती. त्यामुळे, तो लेखकाचा 'कॅनव्हास' बनला होता.

Sample Content

**२. परिणाम लिहा.**

**i. पिवळ्या रंगाचे दगड आपटले.**

**परिणाम :** पिवळ्या रंगाचे दगड आपटले असता त्याची पिवळी पिठासारखी फक्की पडते. त्यात पाणी घातले असता पिवळा रंग तयार होतो.

**ii. लेखक खडकावर तांबड्या मुरुमाने रेषा काढत पुढे जात असे.**

**परिणाम :** लेखक खडकावर तांबड्या मुरुमाने रेषा काढत पुढे गेला असता मागे वळून पाहिल्यावर त्याला त्या रेषा वाळून लालजर्द झालेल्या दिसत. ते पाहून लेखकाला आणखी चित्र काढण्याची सुरसुरी येई.

**३. कारणे शोधा व लिहा.**

**i. गावातील सगळी मुलं नदीच्या डोहात जाऊन पडत.**

**उत्तर :** वैशाख महिन्यातील ऊन असह्य होत असल्यामुळे अंगात गारवा भरावा या हेतूने गावातील सगळी मुलं नदीच्या डोहात जाऊन पडत.

**ii. नदीकाठीचे दगड गुळगुळीत झाले होते.**

**उत्तर :** पाण्याच्या प्रवाहामुळे नदीकाठचे दगड गुळगुळीत झाले होते.

**iii. लेखकाच्या गुडघ्याची सालटं गेली होती.**

**उत्तर :** लेखकाला चित्रकलेची इतकी आवड होती, की नदीकाठच्या खडकांवर तो चित्र रेखाटत असे. ही चित्र रेखाटत असताना तापलेल्या खडकावर टेकून टेकून लेखकाच्या गुडघ्याची सालटं गेली होती.

### कृती ३ - स्वमत

**१. ‘कलाकारांमध्ये जन्मजात असणारी कला व्यक्त करण्याची ऊर्मी त्यांना स्वस्थ बसू देत नाही,’ हे विधान या परिच्छेदावरून स्पष्ट करा.**

**उत्तर :** कोणत्याही कलाकारामध्ये जन्मजात असलेली कला बाहेर येण्याकरिता निरनिराळे मार्ग शोधत असते. अशा वेळी साधनांची कमतरताही अडथळा निर्माण करत नाही. सच्च्या कलाकारामध्ये परिस्थितीतून मार्ग शोधण्याची तळमळ व तयारी असते. लेखकालाही त्याच्यातील कला स्वस्थ बसू देत नाही. त्याला नदीकाठच्या खडकांतही कॅनव्हास दिसतो. त्यावर चित्र काढण्याकरिता लागणारे रंगही त्याला निसर्गातच गवसतात. त्याची त्याच्या कलेप्रति असलेली स्नेहभावना यात दिसून येते. त्याच्यातील चित्रकार प्रतिकूल परिस्थितीतही आपली कला सादर करण्याचा मार्ग शोधून काढताना आपल्याला दिसून येतो. यावरूनच ‘कलाकारात जन्मजात असणारी कला व्यक्त करण्याची ऊर्मी त्याला स्वस्थ बसू देत नाही’ हे स्पष्ट होते.

## परिच्छेद ३

### कृती १ - आकलन

**१. ओघतक्ता पूर्ण करा.**

**लेखक दगडावर चित्रच चित्र रेखाटायचे.**
↓
१
↓
२
↓
३

**उत्तर :** १. पाऊस यायचा.
२. नदी वाहायला लागायची.
३. चित्रं नदीच्या पोटात गडप व्हायची.

***२. एका शब्दात उत्तर लिहा.**

बांबूच्या कोवळ्या काडीपासून तयार व्हायचा –

**उत्तर :** ब्रश

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. २-३**
**[काही दिवसांनी वाटायला ................**
**................ साधना करता येते.]**

### कृती २ - आकलन

***१. योग्य जोड्या जुळवा.**

| क्र. | ‘अ’ गट | | ‘ब’ गट |
|---|---|---|---|
| i. | पिवळा | अ. | झाडांच्या पानापासून |
| ii. | जांभळा | ब. | दगडांपासून |
| iii. | भगवा | क. | काटेसावरीच्या फुलातील परागकणांपासून |
| iv. | हिरवा | ड. | शेंदरी झाडाच्या बियांपासून |

**उत्तर :** (i – ब), (ii –क), (iii – ड), (iv – अ)

**२. खालील तक्ता पूर्ण करा.**

| क्र. | रंग | मिळण्याचे स्रोत |
|---|---|---|
| i. | पांढरा | |
| ii. | लाल | |

**उत्तर :** i. चुना ii. कुंकू

Sample Content

**कृती ३ - स्वमत**

*१. **'तुमच्या इच्छा तीव्र असतील, तर साधनांशिवाय साधना करता येते' या विधानाचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.**

**उत्तर :** माणसाच्या मनातील इच्छा ही प्रत्येक शोधाची जननी असते. या इच्छेची तीव्रता कोणत्याही परिस्थितीत ती पूर्ण करण्याची प्रेरणा देत असते. अशावेळी उपलब्ध असणाऱ्या साधनांमधूनही ती इच्छा पूर्ण केली जाते. त्यामुळे, इतर साधनांचा अभाव ही बाब मनातील तीव्र इच्छेला अडवू शकत नाही. मुळात मनात तीव्र इच्छा असेल, तर त्या-त्या गोष्टीची साधना करण्यात कोणत्याही साधनांचा अभाव अडसर निर्माण करू शकत नाही.

**परिच्छेद ४**

**कृती १ - आकलन**

१. **आकृत्या पूर्ण करा.**

i. **लेखक मूर्ती बनवण्याकरिता वापरत असलेल्या मातीचे विशेष**

[ ] [ ] [ ]

**उत्तर :** १. लालभडक २. मऊशार
३. स्पर्शाला लोण्याप्रमाणे वाटणारी

ii. [ ] ← **लेखकाची मातीचा खेळ खेळण्याची ठिकाणे** → [ ]

**उत्तर :** १. गोठ्याच्या मागच्या बाजूस
२. गावातील मंदिराजवळच्या बकुळीच्या झाडाखाली

*२. **एका शब्दात उत्तरे लिहा.**

i. लालभडक मातीपासून तयार केल्या जायच्या –
ii. ओलं असताना जसं असतं तसंच वाळल्यावरही राहतं –

**उत्तर :** i. मूर्ती ii. गाईचे शेण

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ३**
**[आता हेच पहा, ................**
**................ पुन्हा विचार सुरू...]**

**कृती २ - आकलन**

१. **परिणाम लिहा.**

i. **श्रावण सरता सरता पाऊस कमी झाला तरीही नदी वाहतच असायची.**

**परिणाम :** त्यामुळे, लेखकाचा 'कॅनव्हास' म्हणजेच खडक मोकळा व्हायला चैत्र महिना उजाडत असे.

ii. **लेखकाने गाईचे शेण मातीत मिसळून त्यापासून मूर्ती बनवल्या.**

**परिणाम :** परिणामी, या मूर्ती पूर्वीच्या मूर्तींपेक्षा थोडा अधिक काळ टिकू लागल्या.

२. **कारण शोधा व लिहा.**
**लेखकाचा हिरमोड होत असे; कारण...**

**उत्तर :** छंद म्हणून लेखक मातीच्या मूर्ती बनवत असे; मात्र लालभडक मातीपासून तयार केलेल्या मूर्ती वाळत ठेवल्या, की काही काळाने त्यांना तडे जाऊन त्या ढासळत असत.

**कृती ३ - स्वमत**

१. **पाठात लेखकाने ज्याप्रमाणे स्वतःच्या अडचणीवर स्वतःच उपाय शोधला त्याप्रमाणे तुम्ही तुमच्या अडचणीवर कधी उपाय शोधला आहे का?**

**उत्तर :** हो. मागच्या वर्षी गावी आमच्या गावापासून दूर असलेल्या एका शेतात आम्ही घर बांधले. त्या परिसरात इतर घरे नसल्याने तिथे विजेचा पुरवठा होणे शक्य नव्हते. विजेशिवाय सगळ्याच कामांमध्ये अडचणी निर्माण होत होत्या. त्यामुळे, त्या सोडवण्यासाठी काहीतरी उपाययोजना करणे आवश्यक होते. शाळेत सौरऊर्जा व त्यावर चालणारी उपकरणे याविषयी व्याख्यान ऐकले होते. त्याचा वापर या अडचणीच्या प्रसंगी करावा असे चटकन सुचले. बाबांनाही ती कल्पना आवडली. बाबांनी मित्राच्या मदतीने शहरातून सौरऊर्जेवर चालणारी बंब, सौरपेटी, सौरदिवे इत्यादी स्वरूपाची सामग्री घरी आणली. दोनच दिवसांत सर्व व्यवस्था लावून झाल्यावर घरात जाणवणाऱ्या समस्या हळूहळू दूर झाल्या. आता विजेअभावी आमच्या घरात कोणतीही अडचण येणार नव्हती.

**परिच्छेद ५**

**कृती १ - आकलन**

१. **आकृती पूर्ण करा.**

**आठवडे बाजारात आयते कपडे विकणारा**
↓
(१)
↓
**त्याने आपला माल वाहून नेण्याकरिता वापरलेले वाहन**
↓
(२)

**उत्तर :** १. म्हादू २. घोडा

Sample Content

२. **एका शब्दात उत्तरे लिहा.**

*i. घोड्याच्या शेणाला म्हणतात –

ii. लेखकाने माध्यमिक शाळेत असताना या शास्त्रज्ञाचा धडा वाचला –

**उत्तर :** i. लीद ii. आर्किमीडिज

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ३**
**[आमच्या गावात ................**
**................ भरलेलं राहील.]**

## कृती २ - आकलन

*१. **काय ते सांगा.**

मूर्तीला तडे जाऊ नये यासाठी लेखकाला सापडलेला उपाय.

**उत्तर :** मातीमध्ये घोड्याची लीद मिसळणे.

२. **एका वाक्यात उत्तरे लिहा.**

**i. लेखकाच्या आनंदाची तुलना त्याने कोणाशी केली ?**

**उत्तर :** लेखकाच्या आनंदाची तुलना त्याने आर्किमीडिजला त्याच्या तत्त्व शोधनानंतर झालेल्या आनंदाशी केली आहे.

**ii. आर्किमीडिज आपले तत्त्व शोधण्यासाठी काय करत असे ?**

**उत्तर :** आर्किमीडिज आपले तत्त्व शोधण्यासाठी साध्या वाटणाऱ्या गोष्टीतही ते तत्त्वच शोधत राहायचा.

३. **परिणाम लिहा.**

**प्रत्येकाने आपल्यातील दडलेला आर्किमीडिज कायम जागता ठेवला तर ...**

**परिणाम :** प्रत्येकाचे आभाळ कायम आनंदाने भरलेले राहील.

४. **कारणे शोधा व लिहा.**

**i. लेखकाने मूर्ती बनवण्याकरिता घोड्याची लीद वापरली ; कारण...**

**उत्तर :** घोड्याच्या लिदीमध्ये बरेच धागेधागे असल्याचे लेखकाला जाणवले. हे धागे मातीला घट्ट धरून ठेवतील व त्यामुळे मूर्तींना तडे जाणार नाहीत हा विचार त्याने केला.

**ii. आर्किमीडिज न्हाणीघरातून 'युरेका-युरेका' करत धावत सुटला ; कारण...**

**उत्तर :** आर्किमीडिजला हवं असणारं तत्त्व सापडलं होतं.

## कृती ३ - स्वमत

१. **'तुमच्या प्रत्येकात आर्किमीडिज दडलेला आहे' असे लेखकाने का म्हटले असावे ? तुमचे मत लिहा.**

**उत्तर :** आर्किमीडिज या शास्त्रज्ञाला हवे असणारे तत्त्व त्याने शोधून काढले. त्याकरिता साध्या वाटणाऱ्या गोष्टींचाही त्याने शोध घेतला. तो चिकाटीने प्रयत्न व विचार करत राहिला. त्याप्रमाणे प्रत्येकच माणसात हा गुण दडलेला असतो. थोडा अधिक विचार केला असता, शोध घेतला असता अडचणींचा सामना करण्याचे उपाय निश्चितच सापडतात. सतत चौकस राहिले असता, नव्याचा शोध घेत राहिले असता, आपण नवीन मार्ग नक्कीच शोधू शकतो. म्हणूनच, आपल्या प्रत्येकात एक आर्किमीडिज दडलेला आहे, असे लेखक म्हणतो.

## पाठाधारित कृती

*१. **उत्तर लिहा.**

लेखकाने पाठात कलेसंबंधी वर्णिलेले दोन विषय

**उत्तर :** १. चित्रकला २. मूर्तिकला

## भाषाभ्यास विभाग

### अ. व्याकरण घटकांवर आधारित कृती

*१. **खेळूया शब्दांशी.**

**खाली दिलेल्या शब्दांतून नाम व विशेषणे ओळखून त्यांच्या योग्य जोड्या लावा.**

हिरवी

डोंगर राने सावली

निळे दाट

**उत्तर :**

| नामे | विशेषणे |
|---|---|
| राने | हिरवी |
| सावली | दाट |
| डोंगर | निळे |

२. **गटात न बसणारा शब्द ओळखा व लिहा. तो शब्द गटात का बसत नाही ते सांगा.**

i. रमेश, वेदांत, आपण, वीणा.

ii. तो, त्याला, मला, आला.

iii. रंगीबेरंगी, कठोर, दाट, सारिका.

iv. म्हणतात, जातो, मस्त, आहेत.

**उत्तर :** i. आपण – 'आपण' हे सर्वनाम आहे, तर बाकी सर्व नामे आहेत.

ii. आला – 'आला' हे क्रियापद आहे, तर बाकी सर्व सर्वनामे आहेत.

iii. सारिका – 'सारिका' हे नाम आहे, तर बाकी सर्व विशेषणे आहेत.

iv. मस्त – 'मस्त' हे विशेषण आहे, तर बाकी सर्व क्रियापदे आहेत.

Sample Content

**३. खालील चौकोनांतील अक्षरांमध्ये शब्दयोगी अव्यये लपलेली आहेत. उभ्या, आडव्या, तिरप्या पद्धतीने अक्षरे घेऊन शब्दयोगी अव्यये बनवा व दिलेल्या जागेत लिहा.**

| | | | |
|---|---|---|---|
| नं | छ | स | ह |
| प्र | त | व | ग |
| मा | गे | र | पु |
| णे | ख | ढे | क |
| च | स | क | ट |

**उत्तर :**

| | | | |
|---|---|---|---|
| नं | छ | स | ह |
| प्र | त | व | ग |
| मा | गे | र | पु |
| णे | ख | ढे | क |
| च | स | क | ट |

i. सह
ii. मागे
iii. सकट
iv. प्रमाणे
v. वर
vi. नंतर
vii. पुढे

**४. खालील वाक्यांतील उभयान्वयी अव्यये ओळखा.**
i. निसर्गातून आपलं पालनपोषण होतं आणि निसर्गच आपल्याला नाना कला शिकवतो.
ii. आम्हांला खूप वाटायचं, की आपण चित्रं काढावीत.
iii. सगळ्यांत मोठी अडचण किंवा धाक होता तो घरच्यांचा व मास्तरांचा.

**उत्तर :** i. आणि ii. की iii. किंवा, व

**५. 'सु' हा उपसर्ग लावून शब्द तयार करा व लिहा.**

**उत्तर :** सुसंस्कृत, सुसंस्कार, सुस्वर, सुलेखन, सुरस, सुशिक्षित, सुराज्य.

**६. खालील वाक्यांतील उद्देश्य आणि विधेय ओळखा.**
i. लेखकाचे प्राथमिक शिक्षण लहानशा खेड्यात झाले.
ii. मास्तरांना चित्रं-बित्रं काढलेली आवडत नसत.
iii. गाईचं शेण ओलं असताना जसं असतं तसंच ते वाळल्यावरही राहतं.
iv. आर्किमीडिज न्हाणीघरातून 'युरेक-युरेका' करत धावत सुटला.
v. लेखकाच्या मित्राला चित्रकलेची आवड होती.

**उत्तर :**

| क्र. | उद्देश्य | विधेय |
|---|---|---|
| i. | शिक्षण | झाले |
| ii. | मास्तर | आवडत नसत |
| iii. | शेण | राहतं |
| iv. | आर्किमीडिज | धावत सुटला |
| v. | मित्र | होती |

**७. वाक्यांचे प्रकार ओळखा व लिहा.**
i. निसर्गातून आपले पालनपोषण होते.
ii. पाणी कमी होईपर्यंत काय करायचे?
iii. आमच्या गावात आठवडे बाजार भरायचा.
iv. चित्रात भरावयाचे रंग कोठून आणणार?
v. अरेरे! नदीचं पाणी किती वाढतंय!
vi. चित्र काढू नका.

**उत्तर :** i. विधानार्थी वाक्य ii. प्रश्नार्थी वाक्य
iii. विधानार्थी वाक्य iv. प्रश्नार्थी वाक्य
v. उद्गारार्थी वाक्य vi. आज्ञार्थी वाक्य

**८. खालील शब्दांचा वापर करून प्रत्येकी एक वाक्य तयार करा.**
i. पाऊस ii. उदाहरण

**उत्तर :** i. त्या रात्री धो-धो **पाऊस** पडत होता.
ii. 'बलुतं' हे आत्मचरित्राचं उत्तम **उदाहरण** होय.

## आ. भाषिक घटकांवर आधारित कृती

**१. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.**
i. काठ – **तीर** ii. खडक – **दगड**
iii. थोरला – **मोठा** iv. रेषा – **रेघ**
v. पाऊस – **पर्जन्य, वर्षा** vi. महिना – **मास**
vii. माती – **मृदा** viii. मंदिर – **देऊळ**
ix. तडा – **भेग** x. गाय – **गोमाता**

**२. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द परिच्छेदातून शोधून लिहा.**
i. फायदा × **तोटा** ii. सुसंस्कृत × **असंस्कृत**
iii. आवड × **नावड** iv. मित्र × **शत्रू**
v. सौम्य × **तीव्र**

**३. खालील शब्दांचे लिंग ओळखा.**
i. निसर्ग – **पुल्लिंग** ii. मर्जी – **स्त्रीलिंग**
iii. कला – **स्त्रीलिंग** iv. खेडे – **नपुंसकलिंग**
v. मित्र – **पुल्लिंग** vi. कागद – **पुल्लिंग**

**४. खालील शब्दांचे लिंग बदला.**
i. घोडा – **घोडी** ii. माळी – **माळीन**

**५. खालील शब्दांचे वचन ओळखा व तक्ता पूर्ण करा.**

| क्र. | शब्द | वचन | बदललेले वचन |
|---|---|---|---|
| i. | नदी | | |
| ii. | तडे | | |
| iii. | उपाय | | |
| iv. | गाई | | |

Sample Content

उत्तर :

| क्र. | शब्द | वचन | बदललेले वचन |
|---|---|---|---|
| i. | नदी | **एकवचन** | **नद्या** |
| ii. | तडे | **अनेकवचन** | **तडा** |
| iii. | उपाय | **एकवचन/अनेकवचन** | **उपाय** |
| iv. | गाई | **अनेकवचन** | **गाय** |

**६. खालील शब्दांतील अक्षरांपासून अर्थपूर्ण शब्द तयार करा.**

i. पालनपोषण ii. लालभडक

उत्तर : i. पाल, पालन, पान, पोषण

ii. लाल, लाभ, लाड, भला, भडक, कला, कल, कड

**७. शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा.**

i. आठ दिवसांचा समूह

ii. सततच्या वावरामुळे पायाने मळून झालेल्या वाटा

उत्तर : i. आठवडा ii. पायवाटा

**८. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

**i. दंग होणे** – मग्न होणे.

**वाक्य :** फुटबॉलचा सामना पाहण्यात मी आणि ताई अगदी **दंग झालो होतो**.

**ii. अडून बसणे** – हटून बसणे.

**वाक्य :** सारंग आपल्याला तोच रेनकोट हवा असे म्हणत **अडून बसला**.

**iii. नाद लागणे** – छंद लागणे.

**वाक्य :** या सुट्टीत सर्वांनाच चित्रकलेचा **नाद लागला होता**.

**iv. मर्जीत राहणे** – आवडते बनून राहणे.

**वाक्य :** उत्तम व चोख काम करण्याच्या सवयीमुळे रोहन कायम सरांच्या **मर्जीत राहत असे.**

**v. उफाळून येणे** – उसळून वर येणे.

**वाक्य :** लतादीदींचे गाणे ऐकून माझ्या मनातही गायक होण्याची इच्छा **उफाळून आली.**

**vi. तहानभूक हरपणे** – कामात मग्न होणे.

**वाक्य :** शेतात कामे करता करता शेतकऱ्याची **तहानभूक हरपली.**

**vii. दुथडी भरून वाहणे** – ओसंडून वाहणे.

**वाक्य :** पावसाळ्यात गावातील नदी **दुथडी भरून वाहते.**

**viii. सुरसुरी येणे** – जोम येणे.

**वाक्य :** संध्याकाळचा चहा घेताच रामूला **सुरसुरी आली.**

**ix. हिरमोड होणे** – नाराज होणे.

**वाक्य :** चॉकलेट खाऊ न दिल्यामुळे लहानग्या शामूचा **हिरमोड झाला.**

**९. खालील शब्दांपैकी शुद्ध शब्द ओळखा.**

i. मरजी / मर्झी / मर्जी / मर्जि

ii. सुसंस्कृत / सूसंस्कृत / सुंसस्कृत / सुसंक्रुत

iii. मुरूम / मुरुम / मूरुम / मूरूम

iv. न्हाणीघर / न्हानीघर / नान्हीघर / न्हाण्हीघर

उत्तर : i. मर्जी ii. सुसंस्कृत

iii. मुरूम iv. न्हाणीघर

**१०. खालील विरामचिन्हे ओळखून तक्ता पूर्ण करा.**

| क्र. | विरामचिन्हे | नाव |
|---|---|---|
| i. | ? | |
| ii. | . | |
| iii. | , | |
| iv. | “ ” | |
| v. | ; | |
| vi. | ! | |
| vii. | ‘ ’ | |

उत्तर :

| क्र. | विरामचिन्हे | नाव |
|---|---|---|
| i. | ? | **प्रश्नचिन्ह** |
| ii. | . | **पूर्णविराम** |
| iii. | , | **स्वल्पविराम** |
| iv. | “ ” | **दुहेरी अवतरण चिन्ह** |
| v. | ; | **अर्धविराम** |
| vi. | ! | **उद्गारवाचक चिन्ह** |
| vii. | ‘ ’ | **एकेरी अवतरण चिन्ह** |

## आकारिक मूल्यमापन (Formative Assessment)

### शोध घेऊया

***१. विविध झाडांपासून रंग तयार केले जातात त्याची आंतरजालाच्या मदतीने माहिती मिळवा.**

(**टीप :** या प्रश्नाच्या उत्तराकरिता अनुक्रमणिकेच्या खालील Q. R. Code स्कॅन करावा.)

## चर्चा करूया

***१. प्रत्येकाच्या अंगी काही ना काही कला असते. तुमच्या मित्र-मैत्रिणींसमवेत त्यांना आवडणाऱ्या गोष्टींविषयी (कला) चर्चा करा. ती गोष्ट त्यांना करायला का आवडते? यामागील कारणे समजून घ्या.**

(**टीप :** या प्रश्नाच्या उत्तराकरिता अनुक्रमणिकेच्या खालील Q. R. Code स्कॅन करावा.)

## आपण समजून घेऊया

***१. विधानार्थी, उद्‌गारार्थी, प्रश्नार्थी व आज्ञार्थी या चारही प्रकारांतील वाक्यांचे नमुने तयार करा.**

(**टीप :** या उत्तरासाठी व्याकरण विभागातील वाक्याचे प्रकार - कृ. क्र. १ अभ्यासा.)

## उपक्रम

***१. तुमच्या परिसराचे निरीक्षण करा. परिसरातील विविध घटकांपासून तुम्हांला काय काय शिकायला मिळते याची नोंद करा.**

(**टीप :** या प्रश्नाच्या उत्तराकरिता अनुक्रमणिकेच्या खालील Q. R. Code स्कॅन करावा.)

Sample Content

Page no. **12** to **73** are purposely left blank.

To see complete chapter buy **Target Notes & Target E - Notes**

Sample Content

# व्याकरण विभाग

## १. शब्दांच्या जाती (Part of Speech)

शब्दांच्या जाती म्हणजे शब्दांचे प्रकार होय. शब्दांच्या एकूण आठ जाती आहेत. वाक्यात वापरताना ज्या शब्दांत बदल होतो त्यांना **विकारी** किंवा **सव्यय शब्द** म्हणतात. वाक्यात उपयोग करताना ज्या शब्दांमध्ये बदल होत नाही, त्यांना **अविकारी** किंवा **अव्यय शब्द** म्हणतात. शब्दांच्या एकूण आठ जाती आहेत.

**शब्दांच्या जाती**

| **विकारी शब्द** (सव्यय) | **अविकारी शब्द** (अव्यय) |
|---|---|
| १. नाम | ५. क्रियाविशेषण अव्यय |
| २. सर्वनाम | ६. शब्दयोगी अव्यय |
| ३. विशेषण | ७. उभयान्वयी अव्यय |
| ४. क्रियापद | ८. केवलप्रयोगी अव्यय |

मागील इयत्तेत आपण नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियापद शिकलो. त्यांची थोडक्यात उजळणी करूया.

### नाम (Noun)

कोणतीही वास्तवातील किंवा काल्पनिक व्यक्ती, वस्तू किंवा गुण यांना दिली जाणारी नावे म्हणजे **नाम**.

**नामांचे तीन प्रकार**

| सामान्यनाम | विशेषनाम | भाववाचकनाम |
|---|---|---|
| **उदा.** फळ | **उदा.** आंबा | **उदा.** गोडवा |

### सर्वनाम (Pronoun)

वाक्यात नामाऐवजी वापरल्या जाणाऱ्या शब्दाला **सर्वनाम** म्हणतात.
**उदा.** तो, तू, जो, आपण, त्या, ही.

**सर्वनामांचे सहा प्रकार**

| पुरुषवाचक | प्रश्नार्थक | अनिश्चित | दर्शक | संबंधी | आत्मवाचक |
|---|---|---|---|---|---|
| **उदा.** मी, तू इत्यादी. | **उदा.** कोण, काय इत्यादी. | **उदा.** कोणी, काय इत्यादी. | **उदा.** तो, हा इत्यादी. | **उदा.** जो, जिला इत्यादी. | **उदा.** स्वतः, आपण इत्यादी. |

### विशेषण (Adjective)

नामाबद्दल विशेष किंवा अधिक माहिती सांगणाऱ्या शब्दाला **विशेषण** म्हणतात.
**उदा. लाल** रुमाल, **तुरट** आवळा, **पुष्कळ** वस्तू.

**विशेषणाचे तीन मुख्य प्रकार**

| गुणवाचक | संख्यावाचक | सार्वनामिक |
|---|---|---|
| **उदा.** सुंदर, गोड | **उदा.** दोन, खूप | **उदा.** हे माझे घर आहे. |

### क्रियापद (Verb)

वाक्याचा अर्थ पूर्ण करणारा क्रियावाचक शब्द म्हणजे **क्रियापद**.
**उदा.** आहे, होता, उठला, करतो, खेळतो.

### सरावासाठी कृती

**१. खालील वाक्यांतील नामे ओळखून लिहा.**

i. ते घर बंद होते.
ii. किल्ला फारच सुंदर होता.
iii. खडकावर सुंदर चित्र रेखाटले जात होते.
iv. मांजर, कुत्रा यांसारख्या प्राण्यांना आधाराची गरज असते.
v. पुस्तके आपले मित्र असतात.
vi. दिवाळीला आईने फराळ केला होता.
vii. मीना संगणकावर काम करत होती.
viii. संध्याने औषध घेतले.

**उत्तर :** i. घर
ii. किल्ला
iii. खडक, चित्र
iv. मांजर, कुत्रा, प्राणी, आधार, गरज
v. पुस्तके, मित्र
vi. दिवाळी, आई, फराळ
vii. मीना, संगणक, काम
viii. संध्या, औषध

**२. खाली दिलेल्या नामांचा वाक्यात उपयोग करा.**

i. मडके – **मडके** पाण्याने पूर्ण भरले होते.
ii. अभ्यास – **अभ्यास** करणे हा यशाचा उत्तम मार्ग आहे.
iii. फळा – विद्यार्थ्यांना शिकवताना शिक्षक **फळा** व खडू वापरतात.

Sample Content

iv. माया – यशोधरा बाईंनी मुलांना **माया** लावली होती.

v. वारा – पावसाळ्यातील **वारा** सुखावणारा असतो.

vi. पृथ्वी – **पृथ्वी**वर जणू स्वर्गच अवतरला आहे.

**३. कंसातील योग्य ते सर्वनाम वापरून वाक्ये पूर्ण करा.**

i. _______ मला दिसला. (तो / ते / ती)

ii. _______ माझा मित्र आहे. (ही / हा / ते)

iii. मी जे सांगत आहे _______ नीट ऐका. (जे / ते / हे)

iv. _______ अभ्यास झालाच नव्हता. (त्याचा / तिला / मला)

**उत्तर :** i. तो ii. हा

iii. ते iv. त्याचा

**४. कंसात दिलेल्या सर्वनामांचा वाक्यात उपयोग करा.**

(त्या, ही, कोण, मी, जो, आपण)

**उत्तर :** i. **त्या** मोठ्या पिशवीत खाऊ ठेवला आहे.

ii. **ही** मुलगी चपळ आहे.

iii. त्याला **कोण** समजावणार ?

iv. **मी** निबंध लिहिला.

v. **जो** सराव करेल तो यशस्वी होईल.

vi. **आपण** सारे मिळून मिसळून काम करू.

**५. खालील वाक्यांतील विशेषणे ओळखा व लिहा.**

i. सईने मला कोरडे कपडे दिले. – **कोरडे**

ii. गलेलठ्ठ बोका दारात येऊन उभा होता. – **गलेलठ्ठ**

iii. तेथे पुष्कळ पाणी साचले. – **पुष्कळ**

iv. आपण तुला छानशी गाडी आणू. – **छानशी**

v. ती पहिली मैत्रीण होती. – **पहिली**

**६. खालील नामांसाठी प्रत्येकी दोन-दोन विशेषणे लिहा.**

i. गीत – **सुमधुर, मंजुळ**

ii. कथा – **रहस्यमय, अद्भुत**

iii. अत्तर – **सुगंधी, सुवासिक**

iv. विश्व – **व्यापक, संपूर्ण**

v. मांजर – **लबाड, लोभी**

vi. स्वभाव – **रागीट, प्रेमळ**

**७. खालील वाक्यांतील क्रियापदे ओळखा व लिहा.**

i. रस्त्यात वाघ आडवा येईल. – **येईल.**

ii. सारेच कुजबुजू लागले. – **लागले.**

iii. मला फळे आवडतात. – **आवडतात.**

iv. वादळवारे घोंघावले. – **घोंघावले.**

v. त्याच्या येण्याने सर्वांना दिलासा मिळतो. – **मिळतो.**

**८. खालील क्रियापदांचा वाक्यात उपयोग करा.**

i. थकला – विनायक चालूनचालून **थकला**.

ii. जिंकू – आम्ही क्रिकेटचा सामना **जिंकू**.

iii. बसेन – मी घोड्यावर **बसेन**.

iv. दिसते – मावळतीचे सूर्यबिंब फार सुंदर **दिसते**.


***९. खालील आकृतीत नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियापद यांची उदाहरणे दिली आहेत. आकृतीतील शब्दांचा उपयोग करून अर्थपूर्ण वाक्ये तयार करा.**

(पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. ४९)

**उदा.** i. तुषार गुणी आहे.

ii. तो पिवळा चेंडू खेळतो.

iii. तुषारला मिठाई आवडते.




**उत्तर :** i. तुषारला हा गोड लाडू आवडला.

ii. तुषार मेथीची भाजी खातो.

iii. ती मिठाई गोड होती.

iv. ती व्यक्ती खेळकर आहे.

v. तिला त्या रंगीत वस्तू आवडतात.

vi. त्याने ती वस्तू ओळखली.

vii. ही सुंदर वस्तू तिला आवडली.

viii. तुषारने मोठा चेंडू घेतला.

ix. खेळकर तुषार चेंडू घेऊन पळाला.

x. तिने हिरव्या मेथीची भाजी केली.

(**टीप :** विद्यार्थी अशा प्रकारची अधिक वाक्ये स्वत: तयार करू शकतात.)

## क्रियाविशेषण अव्यय (Adverb)

क्रियापदाबद्दल विशेष/अधिक माहिती सांगणाऱ्या अविकारी (बदल न होणाऱ्या) शब्दास **क्रियाविशेषण अव्यय** म्हणतात. वाक्यात घडणारी क्रिया केव्हा, कोठे, किती वेळा व कशी घडली याविषयी ही अव्यये माहिती सांगतात.

**उदा.** संदीप **दररोज** व्यायाम करतो.

Sample Content

वरील वाक्यात ‘दररोज’ हा शब्द व्यायाम करण्याची क्रिया किती वेळा घडली याबद्दल अधिक माहिती देत आहे. म्हणून, ‘दररोज’ हे क्रियाविशेषण अव्यय आहे.
खालील वाक्यांतील क्रियाविशेषणे अभ्यासा.

१. काका **काल** घरी आले होते.
२. राघव **पटकन** निघून गेला.
३. माझे घर रस्त्याच्या **अलीकडेच** आहे.
४. त्या दोन जुळ्या भावांमध्ये **किंचित** फरक आहे.

**क्रियाविशेषण अव्ययांचे प्रकार**

- कालवाचक
- रीतिवाचक
- स्थलवाचक
- परिमाणवाचक / संख्यावाचक

**i. कालवाचक क्रियाविशेषण अव्यय –**
आधी, वारंवार, सध्या, काल, दररोज इत्यादी अव्यये एखादी क्रिया केव्हा, किती वेळा घडली किंवा तिचा काळ दर्शवतात. म्हणून, त्यांना **कालवाचक क्रियाविशेषण** म्हणतात.
**उदा. काल** दिनूची परीक्षा संपली.

**ii. रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यय –**
पटकन, आपोआप, सावकाश, हळू असे शब्द एखादी क्रिया कशी घडते ते दर्शवतात. म्हणून, त्यांना **रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यय** म्हणतात.
**उदा.** बाळ **खुदकन** हसले.

**iii. स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यय –**
जिकडे, सर्वत्र, इथे, समोरून असे शब्द एखादी वाक्यातील क्रिया कोठे घडत आहे ते ठिकाण / स्थान दर्शवतात. म्हणून, त्यांना **स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यय** म्हणतात.
**उदा.** माझ्या **समोरून** वाघ गेला.

**iv. परिमाणवाचक / संख्यावाचक क्रियाविशेषण अव्यय –**
काहीसा, भरपूर, मोजके, अत्यंत इत्यादी सारखे शब्द एखादी क्रिया किती वेळा घडली किंवा क्रियेचे परिमाण दर्शवतात. म्हणून, अशा शब्दांना **संख्यावाचक** किंवा **परिमाणवाचक अव्यय** म्हणतात.
**उदा.** आजोबा **नेहमी** चालायला जातात.

## शब्दयोगी अव्यय (Preposition)

वर, खाली, पासून, साठी यांसारख्या नामांना जोडून येणाऱ्या शब्दांना **शब्दयोगी अव्यय** म्हणतात.
**उदा.** १. डबा फळी**वर** आहे.
२. मंदिर**जवळ** तलाव आहे.
३. मामाने दिपू**साठी** खाऊ आणला.

वरील वाक्यांत वर, जवळ, साठी हे शब्द नामास जोडून आले आहेत. म्हणून, त्यांना **शब्दयोगी अव्यय** म्हणतात.
शब्दयोगी अव्यय व क्रियाविशेषण अव्यय यांत फरक आहे हे लक्षात घ्या.

| क्र. | शब्द | शब्दयोगी अव्यय | क्रियाविशेषण अव्यय |
|---|---|---|---|
| १. | खाली | तो झाडा**खाली** उभा होता. | ती जिन्याने **खाली** गेली. |
| २. | समोर | सागर माझ्या**समोर** उभा आहे. | अचानक कोल्हा **समोर** आला. |
| ३. | जवळ | मामा**जवळ** गाडी आहे. | माझे ऑफिस **जवळ** आहे. |
| ४. | मध्ये | त्या दोघां**मध्ये** पडू नको. | तू **मध्ये** का बोलतोस ? |
| ५. | बाहेर | सर्व पक्षी घरट्या**बाहेर** उडाले. | मी **बाहेर** जाऊन येतो. |

## उभयान्वयी अव्यये (Conjunction)

‘उभय’ म्हणजे दोन व ‘अन्वय’ म्हणजे जोडणे. दोन शब्द किंवा दोन वाक्ये जोडणाऱ्या शब्दाला **उभयान्वयी अव्यय** असे म्हणतात.
**उदा.** १. आईने सर्वांना लाडू **व** चिवडा दिला.
२. ढग गडगडले **आणि** पाऊस सुरू झाला.
३. चिंटू मस्ती करतो **म्हणून** ओरडा खातो.

वरील वाक्यांत ‘व’, ‘आणि’, ‘म्हणून’ हे शब्द दोन वाक्य किंवा दोन शब्द यांना जोडतात, म्हणून त्यांना **उभयान्वयी अव्यये** म्हणतात.

## केवलप्रयोगी अव्यये (Interjection)

मनातील आनंद, दु:ख, आश्चर्य अशा भावना आपण एखाद्या उद्गाराद्वारे व्यक्त करतो, तेव्हा त्या उद्गारवाचक शब्दांना **केवलप्रयोगी अव्यय** म्हणतात.
**उदा.** i. **अरेरे!** धोनी आऊट झाला!
ii. **छे!** मी तिकडे गेलोच नाही!
iii. **अहाहा!** किती सुंदर देखावा आहे!

वरील वाक्यांत ‘अरेरे’, ‘छे’, ‘अहाहा’ हे शब्द मनातील भावना एका उद्गारावाटे दर्शवतात, म्हणून त्यांना उद्गारवाचक शब्द म्हणतात. आपल्या जितक्या भावना तितके केवलप्रयोगी अव्ययाचे विविध प्रकार पडतात. काही भावना व त्या व्यक्त करणारे शब्द पुढीलप्रमाणे :

Sample Content

| केवलप्रयोगी अव्ययांचे प्रकार | शब्द |
|---|---|
| हर्षदर्शक | अहाहा, वा, वावा, आहा, ओहो, आ–हा, |
| शोकदर्शक | ऊं, अॅ:, अरेरे, अगाई, अयाई, हायहाय, हाय |
| आश्चर्यकारक | ऑ, ओहो, अबब, बापरे, अहाहा, चक्चक्, अरेच्चा. |
| प्रशंसादर्शक | शाब्बास, भले, वाहवा, छान, ठीक, फक्कड, खाशी. |
| संमतिदर्शक | हां, जी, जीहां, ठीक, बराय, हाँ, अच्छा. |
| विरोधीदर्शक | छे, छट्, हॅट, ऊ:, उंहू, च, अंहं, छे छे. |
| तिरस्कारदर्शक | शी, हुडुत, हुड, हत्, छी, इश्श |
| संबोधनदर्शक | अरे, अगे, अहो, ए, अगो, बा, रे. |
| मौनदर्शक | चूप, गप, गुपचूप, चिडीचूप. |

## सरावासाठी कृती

**१. खालील वाक्यांतील क्रियाविशेषण अव्यये ओळखा व लिहा.**

i. गीताने फार घाईघाईने काम आवरले.
ii. त्याने सहजगत्या परीक्षा उत्तीर्ण केली.
iii. विलासरावांची तब्येत बिघडताच तातडीने त्यांना रुग्णालयात नेले.
iv. पुराचे थैमान पाहून लोक ओक्साबोक्शी रडत होते.

**उत्तर :** i. घाईघाईने ii. सहजगत्या
iii. तातडीने iv. ओक्साबोक्शी

**२. खालील चौकोनांतील अक्षरांत क्रियाविशेषण अव्यये लपली आहेत, ती शोधा व लिहा.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| स | दा | प | र | वा |
| क | ड | र | ज | रं |
| स | त | त | व | वा |
| दि | व | स | भ | र |

**उत्तर :**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| स | दा | प | र | वा |
| क | ड | र | ज | रं |
| स | त | त | व | वा |
| दि | व | स | भ | र |

i. सदा ii. परवा
iii. सतत iv. दिवसभर
v. परत vi. वारंवार

**३. खालील परिच्छेदातील शब्दयोगी अव्यये अधोरेखित करा.**

शाळेच्या पटांगणावर खेळण्याकरता मुलांना भरपूर जागा आहे. मुले आपल्या मित्रांसोबत, मैत्रिणींसोबत मनसोक्त खेळाची मजा लुटतात. या मोकळ्या पटांगणावर उभ्या असणाऱ्या भव्य झाडाखाली बसून मध्यान्ह भोजनाची मजा घेता येते. मागच्या वीस वर्षांपासून आजपर्यंत हे झाड सर्वांना सुखावत आहे. या पटांगणाखेरीज शाळेला शोभाच येणार नाही. मागच्या वर्षी वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त सर्व गावकरी येथे जमले होते.

**उत्तर :** शाळेच्या पटांगणावर खेळण्याकरिता मुलांना भरपूर जागा आहे. मुले आपल्या मित्रांसोबत, मैत्रिणींसोबत मनसोक्त खेळाची मजा लुटतात. या मोकळ्या पटांगणावर उभ्या असणाऱ्या भव्य झाडाखाली बसून मध्यान्ह भोजनाची मजा घेता येते. मागच्या वीस वर्षांपासून आजपर्यंत हे झाड सर्वांना सुखावत आहे. या पटांगणाखेरीज शाळेला शोभाच येणार नाही. मागच्या वर्षी वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त सर्व गावकरी येथे जमले होते.

**४. खालील शब्दयोगी अव्ययांचा वाक्यात उपयोग करा.**

i. निमित्त – सुमनने रिमाला वाढदिवसा**निमित्त** सुंदर भेट दिली.
ii. पासून – माझ्या घरा**पासून** सुशीलचे घर थोड्याच अंतरावर आहे.
iii. नंतर – दिवाळी**नंतर** लगेचच चाचणी परीक्षा आहे.
iv. करता – रमेश मुलां**करिता** खेळणी घेऊन आला.
v. वर – आजी पलंगा**वर** बसली होती.

**५. खालील वाक्यांतील उभयान्वयी अव्यये ओळखून लिहा.**

i. मंगळवार व गुरुवार या दोन दिवशी चित्रकलेचा तास असतो.
ii. मीता घरी आली होती; कारण तिला माझे पुस्तक हवे होते.
iii. बाबा बाजारातून आंबे किंवा फणस आणणार होते.
iv. सिनेमा पाहण्याकरिता सिनेमागृहात गेलो खरा; पण तिकिटेच संपली होती.
v. पहाट झाली आणि पक्ष्यांची किलबिल ऐकू येऊ लागली.

**उत्तर :** i. व ii. कारण
iii. किंवा iv. पण
v. आणि

**६. खालील उभयान्वयी अव्ययांचा वापर करून वाक्ये लिहा.**

i. परंतु – मी शर्यतीत भाग घेणार होतो; **परंतु** पायाला जखम झाल्याने ते शक्य झाले नाही.

Sample Content

Page no. **78** to **90** are purposely left blank.

To see complete chapter buy **Target Notes & Target E - Notes**

Sample Content

# १ पत्रलेखन

**उपयोजित लेखन विभाग**

पत्रलेखन ही एक कला आहे. एका व्यक्तीचे विचार/भावना दुसऱ्या व्यक्तीपर्यंत लिखित स्वरूपात पोहोचवण्याचे हे एक महत्त्वाचे आणि उत्तम साधन आहे. विषय आणि स्वरूपानुसार पत्रलेखनाचे दोन प्रमुख प्रकार पडतात.

१. औपचारिक पत्र  २. अनौपचारिक पत्र

मागील इयत्तांमध्ये तुम्ही अनौपचारिक प्रकारची पत्र कशी लिहावीत, हे शिकला आहात. या वर्षी तुम्ही औपचारिक पत्रलेखन कसे करावे, हे शिकणार आहात.

आज आधुनिक तंत्रज्ञानामुळे माहिती आणि विचारांची देवाणघेवाण यासाठी अनेक साधने उपलब्ध आहेत. त्यामुळे, पत्र लिहिण्याचे प्रमाण आज कमी झाले आहे. तरीदेखील अर्ज करणे, विनंती करणे, मागणी करणे अशा कामांसाठी कार्यालयीन पत्रव्यवहार करताना औपचारिक स्वरूपातील पत्र लिहावी लागतात. ही पत्र व्यक्तिगत किंवा सार्वजनिक स्तरावर लिहिली जातात.

## पत्रात समाविष्ट असलेल्या बाबी

**औपचारिक पत्र :**

१. पत्राच्या वरच्या डाव्या कोपऱ्यात दिनांक लिहावा.
२. प्रति, लिहून संबंधित व्यक्तीचा समर्पक हुद्दा नमूद करावा.
   उदाहरणार्थ : मुख्याध्यापक, प्राचार्य, क्रीडाधिकारी, सचिव, अध्यक्ष, व्यवस्थापक, संचालक, कार्यकारी संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी, कार्यकारी अभियंता इत्यादी. पुढे त्यांचे नाव व पत्ता लिहावा.
३. पत्राचा विषय लिहावा.
४. पत्राचा आशय मोजक्या व अचूक शब्दांत मांडावा.
५. शेवटी डावीकडे आपला विश्वासू, आपला कृपाभिलाषी इत्यादी शब्द लिहून खाली पत्र पाठवणाऱ्याचे नाव, पत्ता व इ-मेल आयडी टाकावा.

## औपचारिक पत्राचे प्रारूप

दिनांक
प्रति,
माननीय _______ ,
(योग्य त्या मान व पदासह ज्यांना पत्र पाठवायचे आहे त्यांचे नाव, हुद्दा व पत्ता)

विषय : ____________________ (पत्राचे कारण)

महोदय,

विषयानुसार मजकूर

आपला विश्वासू,
___________,
___________,
_________xxxxxx
(पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता)
इ-मेल – abc@gmail.com

Sample content

## नमुना कृती

### विनंती पत्र

***१. तुमच्या शाळेमध्ये उन्हाळी सुट्टीत 'हस्ताक्षर सुंदर करूया!' हे १० दिवसांचे शिबीर आयोजित केले आहे. त्यात तुम्हांला सहभागी करून घेण्याची विनंती करणारे पत्र वर्गशिक्षकांना लिहा.** (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र. २५)

**उत्तर :**

दिनांक : १५ मे, २०२२

प्रति,
माननीय श्री. संकेत महाजन,
वर्गशिक्षक, इयत्ता आठवी, तुकडी 'अ',
सरस्वती विद्यालय,
नाशिक – xxxxxx

**विषय :** 'हस्ताक्षर सुंदर करूया!' शिबिरामध्ये सहभागी होण्याबाबत.

माननीय महोदय,
आपल्या शाळेत दिनांक २० मे ते ३० मे या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या 'हस्ताक्षर सुंदर करूया!' या शिबिरामध्ये मला सहभागी व्हायचे आहे. वार्षिक परीक्षेच्या निकालाच्या दिवशी मी शाळेत उपस्थित राहू शकले नाही त्यामुळे मला या शिबिराच्या आयोजनाची माहिती कळू शकली नाही. कालच मला मैत्रिणीकडून या शिबिराबद्दलची माहिती मिळाली. या शिबिराचे संयोजन तुम्ही करत असल्याचेही समजले. हे शिबिर सुरू व्हायला आता फक्त चार दिवस शिल्लक आहेत आणि त्यासाठी प्रवेशाच्या जागादेखील मर्यादित आहेत. त्यामुळे, शक्य झाल्यास मला या शिबिरात सहभागी होण्याची संधी द्यावी, ही नम्र विनंती.

आपला विश्वासू,
अ. ब. क.,
१०४, श्रीनिवास अपार्टमेंट,
विजय मार्ग, पंचवटी,
नाशिक – xxxxxx
इ-मेल – abc@gmail.com

### मागणी पत्र

**२. वर्गाचा क्रीडा प्रतिनिधी म्हणून क्रीडा साहित्य विक्रेत्याकडे आवश्यक क्रीडा साहित्याची मागणी करणारे पत्र लिहा.**

**उत्तर :**

दिनांक : १५ नोव्हेंबर, २०२२
माननीय व्यवस्थापक,
मेट्रो स्पोर्ट्स स्टोअर,
नागोठणे – xxxxxx

**विषय :** 'क्रीडा साहित्या' ची मागणी करण्याबाबत.

माननीय महोदय,
आमच्या शाळेत डिसेंबर महिन्याच्या अखेरीस 'जिल्हास्तरीय आंतरशालेय क्रीडा स्पर्धेचे' आयोजन करण्यात आले आहे. त्यासाठी आम्हांला काही क्रीडा साहित्याची आवश्यकता आहे. क्रीडा शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आवश्यक क्रीडा साहित्याची यादी तयार करून सोबत देत आहे.

Sample Content

## AVAILABLE BOOKS FOR STD. VIII:
(ENG., MAR. & SEMI ENG. MED.)

### NOTES
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- History and Civics
- Geography
- General Science
- Mathematics

### NOTES
- My English Book
- मराठी बालभारती
- हिंदी सुलभभारती
- इतिहास व नागरिकशास्त्र
- भूगोल
- सामान्य विज्ञान
- गणित

### WORKBOOK
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- My English Book
- मराठी बालभारती

## AVAILABLE BOOKS FOR STD. IX:
(ENG., MAR. & SEMI ENG. MED.)

### NOTES
- English Kumarbharati
- मराठी अक्षरभारती
- हिंदी लोकभारती
- हिंदी लोकवाणी
- आमोद: सम्पूर्ण-संस्कृतम्
- आनन्द: संयुक्त-संस्कृतम्
- History and Political Science
- Geography
- Mathematics (Part - I)
- Mathematics (Part - II)
- Science and Technology

### NOTES
- My English Coursebook
- मराठी कुमारभारती
- इतिहास व राज्यशास्त्र
- भूगोल
- गणित (भाग - I)
- गणित (भाग - II)
- विज्ञान आणि तंत्रज्ञान

### WORKBOOK
- English Kumarbharati
- मराठी अक्षरभारती
- हिंदी लोकभारती
- My English Coursebook
- मराठी कुमारभारती

### ADDITIONAL TITLES
Grammar & Writing Skills Books
(Std. VIII, IX & X)
- Marathi
- Hindi
- English

### OUR PRODUCT RANGE
Children Books | School Section | Junior College
Degree College | Entrance Exams | Stationery

Visit Our Website


Target Publications® Pvt. Ltd.
Transforming lives through learning.

**Address:**
2nd floor, Aroto Industrial Premises CHS,
Above Surya Eye Hospital, 63-A, P. K. Road,
Mulund (W), Mumbai 400 080
**Tel:** 88799 39712 / 13 / 14 / 15
**Website:** www.targetpublications.org
**Email:** mail@targetpublications.org





Explore our range of STATIONERY